# के. के. वाघमध्ये राष्ट्रीय परिषद उत्साहात

## फार्मसी क्षेत्रातील आव्हाने व संधी विषयावर विचारमंथन

**नाशिक : प्रतिनिधी**




के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित फार्मसी महाविद्यालयाच्या आय.क्यू.ए.सी. विभागाच्या वतीने फार्मास्युटिकल्समधील जागतिक नियामक धोरणे या विषयांवर एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे नुकतेच आयोजन करण्यात आले. परिषदेचा उद्देश हा फार्मसी क्षेत्रातील आव्हाने व भविष्यातील संधी यांवर विचार मंथन करणे हे होय. महाराष्ट्रातील २७० हून अधिक विद्यार्थ्यांनी यात सक्रिय सहभाग नोंदविला.

परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून अमित खोडके व डॉ. श्रीकांत नाईक हे उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर समन्वयक डॉ. एन एस. पाटील, प्राचार्य डॉ. के. एस. साळुंखे, प्राचार्य प्रा.आर ए. हिरोळे, परिषद प्रमुख व अंतर्गत गुणवत्ता विभाग प्रमुख डॉ. आर. डी. अमृतकर हे उपस्थित होते. प्रथम सत्रात अमित खोडके यांनी फार्मसी क्षेत्रातील रेग्युलेटरी अफेअर्सची ओळख व प्रणाली व रेग्युलेटरी एजन्सी आदींवर मार्गदर्शन केले. विभाग प्रमुख डॉ. डी. डी. पाटील यांनी या सत्राचे अध्यक्षस्थान भूषविले. द्वितीय सत्रात डॉ. श्रीकांत नाईक यांनी ग्लोबल रेग्युलेटरी अफेअर्स, रेग्युलेटरी व्यवस्थापन व रेग्युलेटरी अफेअर्स क्षेत्रातील उपलब्ध संधी यावर मार्गदर्शन केले. या वेळी विभागप्रमुख डॉ. पी. आर. शिरोडे यांनी अध्यक्ष म्हणून कामकाज पाहिले. परिषदेत सहभागी झालेल्या विविध महाविद्यालयातील ६३ हून अधिक विद्यार्थ्यांनी पोस्टर प्रेझेंटेशन सादर केले. पोस्टर प्रेझेंटेशनचे रोहन पवार व डॉ. सचिन कुशारे यांनी याचे मुल्यांकन केले. त्याचप्रमाणे तिसऱ्या सत्रात मनोज अलई यांनी रेग्युलेटरी अफेअर लेबलींग क्षेत्रातील महत्व विशद केले. विभागप्रमुख डॉ. ए. आर. सुरणा हे अध्यक्ष होते. प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकाविलेल्या संघास पारितोषिक प्रदान करण्यात आली.

संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ, विश्वस्त मंडळ, सचिव प्रा. के. एस. बंदी, समन्वयक डॉ. एन एस पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य डॉ. के. एस. साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. तसेच डॉ. आर. डी अमृतकर यांनी माहिती दिली. सूत्रसंचालन विद्यार्थिनी साक्षी रायते तर आभार अंजली अहिरे हिने मानले.